# दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ०१/२०२६ मधील नि. १ वरील आदेश

**संगिता वसंत वाघमारे विरुद्ध शशिकला कुमार आवळे व.**

[CNR NO. MHSN07000003-2026]

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ कलम ८ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**अर्जदाराच्या अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे :-**

२. अर्जदार क्र. १ व जाबदार क्र. १ ते ३ चे वडील वसंत काका वाघमारे हे दि. २३.११.२०२२ रोजी कवठेमहांकाळ येथे मयत झाले. मयत वसंत काका वाघमारे यांना अर्जदार क्र. १ व जाबदार क्र. १ ते ३ हेच कायदेशीर वारस आहेत. अर्जदार व जाबदार क्र. १ ते ३ शिवाय मयतांस अन्य कोणीही वारस नाहीत. मयत वसंत काका वाघमारे यांनी त्यांचे हयातीत कोणतेही मृत्युपत्र मागे लिहून ठेवलेले नाही. अर्जदार व जाबदार क्र. १ ते ३ हेच मयत वसंत काका वाघमारे यांचे नजीकचे व कायदेशीर वारस आहेत. अर्जदारास निवृत्ती पेन्शन मिळणेकामी व इतर शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत वसंत काका वाघमारे यांचे अर्जदार व जाबदार क्र. १ ते ३ हे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्याची विनंती केली आहे.

३. अर्जदार व जाबदार तर्फे युक्तिवाद ऐकला. अभिलेखाची पाहणी केली.

४. अर्जातील बाबींना व अर्जदारांच्या युक्तीवादास अनुसरुन खालील मुद्दे माझे समोर उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार व जाबदार हे मागणी प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे काय ? | होय. |

| | | |
|---|---|---|
| २. | आदेश काय | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ बाबत**

५. अर्जदाराने त्याचे अर्जातील कथनाच्या पृष्ठ्यर्थ अर्जदार क्र. १ संगिता वसंत वाघमारे यांनी पुराव्याचे शपथपत्र नि. क्र. २२ वर, मयत वसंत काका वाघमारे यांचे मृत्यु प्रमाणपत्र नि. क्र. ७ कडे, मयत सुभद्रा वसंत वाघमारे यांचे मृत्यु प्रमाणपत्र नि. क्र. ८ कडे, अर्जदार क्र. १ यांचा जन्माचा दाखला नि. क्र. ९ कडे, ते ४ यांचे अर्जदार यांचे आधार कार्ड झेरॉक्स, तसेच वर्तमानपत्र दै. बंधुता मधील जाहीर प्रगटन केल्याची प्रत, पुरावा बंद पुरसीस नि. क्र. २४ व जाबदार क्र. १ शशिकला कुमार आवळे यांनी यांचे पुराव्याचे शपथपत्र नि. क्र. २३ वर, जाबदार यांची पुरावा बंद पुरसीस नि. क्र. २५ अशी कागदपत्रे दाखल केली आहेत. पटलावर दाखल एकंदर पुरावा पाहता तो अर्जातील कथनांशी सुसंगत व समर्थनीय दिसुन येते.

६. प्रस्तुत प्रकरणात आक्षेप मागविण्यासाठी दि. १४.०३.२०२६ रोजी दैनिक बंधुता या वर्तमानपत्रामधील जाहीर प्रगटन केल्याची प्रत अशी कागदपत्रे दाखल केली आहेत.

७. पटलावर दाखल एकंदर पुरावा पाहता तो अर्जातील कथनांशी सुसंगत व समर्थनीय असल्याचे दिसुन येते. अर्जदाराने त्याच्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये, मयतांस अर्जदार व जाबदार क्र. १ ते ३ व्यतिरीक्त इतर कोणीही वारस नसल्याचे शपथेवर कथन केले आहे. त्यामुळे अर्जदार व जाबदार क्र. १ ते ३ हे मयताचे वारस आहे हे सिद्ध होते. तसेच जाबदार क्र. १ ते ३ यांनी हजर होवून आपले म्हणणे दाखल करुन अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यास हरकत नाही असे कळवले आहे. अर्जदार व जाबदार हे मयताचे वर्ग –१ चे वारस असल्याने सर्वजण वारसप्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत.

त्यामुळे मी मुद्दा क्र. १ च्या निष्कर्ष होकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र. २ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो. |
| २. | अर्जदार क्र. १ संगिता वसंत वाघमारे (लग्नापूर्वीचे नाव) श्रीमती संगिता किरण आवळे (लग्नानंतरचे नाव), जाबदार क्र. १ शशिकला कुमार आवळे, जाबदार क्र. २ राजू वसंत वाघमारे व जाबदार क्र. ३ संजय वसंत वाघमारे हे मयत वसंत काका वाघमारे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस–प्रमाणपत्र देण्यात येत आहे. |
| ३. | आवश्यक ते न्यायालयीन शुल्क स्विकारुन अर्जदार व जाबदार क्र. १ ते ३ यांचे नावे वारस प्रमाणपत्र देण्यात यावे. |

MAHESH ARVINDRAO KULKARNI
Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.06.30 15:53:13 +0530

**दिनांक : ३०.०६.२०२६** **( एम. ए. कुलकर्णी )**
ठिकाण : कवठेमहांकाळ सह दिवाणी न्यायाधीश क स्तर,
कवठेमहांकाळ.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 30.06.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 30.06.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 30.06.2026 |